International Indexed, Refereed Research Journal, ISSN 2250-253x, (Print), E- ISSN 2320-544x, Issued -6, Vol- I, June, 2013

शोध पत्र

# जागतिकीकरण आणि दलित कविता

* प्रा. डॉ. सुनील आनंदराव राठोड़

* श्रीमती कोकिळाबाई गावंडे महिला महाविद्यालय, दर्यापूर, जि . अमरावती

*सारांश :- समाजाचे प्रतिबिंब साहित्यातून दृगोचर होते. भारतीय समाजातील दलित आदिवासी, ग्रामीण, शहरी अशा लोकजीवनाचे वाङ्‌मय दर्शन कवितेतून घडविले. समता, स्वातंत्र्य व बंधुभाव या मूल्यांचा मानवी जीवनात असलेला अभाव विचारात घेऊन ही मूल्य रुजविण्यासाठी कवितेचे अस्त्र वापरले आणि एक नवी चेतना समाजासमोर ठेवली. माणसाला सर्वश्रेष्ठ माननारी संकल्पना दलित कवितेने केंद्रस्थानी ठेवून विद्रुप करणारी समाजिक, आर्थिक, राजकीय धर्मिक तत्वे नारली किंबहुना त्या विद्रुपतेच्या विरोधात विद्रोह केला. दलित कविता जागतिकीरणाच्या रेट्यात नव्याने प्रकट होऊ लागली. १४ ऑक्टोबर १९५६ च्या दिक्षाभूमीवरुन बोध्दधम्म स्वीकाराचा अभूतपूर्व परिणाम जागतिकीरणाच्या प्रवाहात उमटू लागला. मराठी समाज संस्कृतीसोबत भारतीय समाजमन व साहित्यिक जग ढवळून निघाले. सामाजिक जीवनपध्दतीमध्ये बदल होऊन. शोषणाधिष्ठीत विचारसरणीमध्ये नवे परिवर्तन आले. असे समाजमनात बदालाचे वारे वाहत असतांना २६ जानेवारी १९५० ला भारताने गणराज्य पध्दती स्वीकारली. भारतीय राज्यघटनेने दिलेला स्वतंत्र्य, समता व बंधुभाव या मूल्यांचा उद्‌घोष उदयास आला.*

*जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत जुनी शोषणवादी विचारजाणीव व नवी शेषणविरहीत समाजजात यांचे एक व्दंव्द गतिमान होऊ लागले. जातीवर्ण वर्गाचे आधार शोधणारी मीमांसा मांडली जाऊ लागली. साहित्याचे वर्तुळ विस्तृत केले. आणि साहित्याच्या आरशात संपूर्ण समाज प्रतिबिंब या साहित्याने दाखविले. समाज चित्रणाचा त्याला लोकशाही गणराज्याच्या मूल्यजाणीवांचे अधिष्ठान दिले. समाजिक न्याय संकल्पनांचे वाङ्‌मयाला आधार दिले. दारिद्र्य, दास्य , पिळवणूक अन्याय, अत्याचार शोषणाखाली दबलेला मान व त्यांच्या भावभानांना वाङ्‌मयरुप दिले. मराठी भाषा संस्कृतित आंबेडकरवादी अथवा दलित कविता मानवतावादी मूल्यांची क्रांती घडविलं. आज ती भारतातील विविध प्रांतिक भाषा व कवितेतून प्रगटली आहे.*

**प्रास्ताविक :**

आधुनिक मराठी काव्यसंस्कृतीची वाटचाल विविध जाणीवांनी व अनेक कविंच्या अनुभूतीने विकसित झाली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या तत्वज्ञानातून प्रेरणा घेऊन दलित कवितेची काव्यमुद्रा जीवनानुभवातून प्रकटली आहे. जगण्यातील समर्थ आशय मांडत, माणसाचे माणूसपण नाकारलेल्या खोट्या दांभिक परंपरेच्या कल्पना पूसून टाकण्यात व माणूसकीचे मूल्य रुजविण्यात हवी असणारी ताकत घेऊन आली आहे. ज्या गावकुसाबाहेर लोकांच्या भावभावना, आशा - आकांक्षा, ध्येय स्वप्न धगधगते जीववास्तव शब्दात तोलुन धरण्यास धजत नव्हते जिथे काव्यप्रतिभा लुळ्या पडल्या होत्या त्या जीवनाला दलित कवितेने जागतिकीकरणाच्या युगात काव्याच्या दरबारातील सिंहासनावर बसविले. आणी त्या जीवनानुभवाला काव्याचे महान रुप दिले.

शोषक परंपरेचा विचार केला तर शोषकवर्ग हा शोषितांचा गुलाम म्हणून वापर करण्यावर अधिक भर देतात. गुलामांना स्वतःचे अस्तित्व, विचार नसतात. एकदा मानसाला गुलाम म्हणून जगायची सवय पडली की, त्याच्या जगण्यावर त्याचा विपरित परीणाम होतो. वैचारीक दृष्ट्या आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिकदृष्ट्या गुलामी स्वीकारणाऱ्याची विचारप्रक्रीया मंदावते व पुढे ती नष्टप्राय होत जाते. गुलामी स्वीकारणाऱ्यांवर सत्ता प्रस्तापित करणे सहज शक्य होते. हा विचार समोर ठेऊन जगभराच्या प्रामाणिक शारिरीक व बौध्दिक कष्ट करणाऱ्यांना गुलाम बनविण्यासाठी विषम व्यवस्था निर्माण करणाऱ्या शोषकांना जगभरातील तरुणांनी **'ऑक्युपाय वॉल स्ट्रीट'** अशा आंदोलनातून इशारा दिला आहे. या आंदोलनाव्दारा शोषक व्यवस्थेला हादरे देत ती खिळखिळी करण्यासाठी मिळेल ते माध्यम वापरुन जनसंवादी प्रवाह निर्माण केला जातो. जागतिकीकरणाऱ्या माध्यमातुन जे नवतंत्रज्ञान मोठ्या प्रमाणात उपलब्ध झाले त्याचा वापर शोषक व्यवस्थेला हादरे देण्यासाठी करण्यात येत आहे. धर्य़ आणि जातीयता , शस्त्र, बल , भिती ही अस्त्रे वापरुन दमनप्रक्रिया गतिमान करुन गुलमांच्या निर्मितीला बळ दिले जात आहे.

जागतिकीकरणामुळे मानवी जीवनाचे जगण्याचे संदर्भ व जीवनमूल्य बदलले "जागतिकिकरण खाजगीकरणाच्या माध्यमातून अधिक गतीनं आलेल्या जात , धर्म, वंश, संप्रदाय यातून चंगळवादी, साम्राज्यवादी व्यवस्थेनं माणसाला विचारशून्य करण्याची प्रक्रिया अधिक गतिमान केली. वर्गकलहाच्या निर्मिती प्रक्रियेला चालना दिली गेली. ग्राहक आणि मालक यांच्यात भेद करण्यात आर्थिक साम्राज्यवादा बरोबरच धार्मिक साम्राज्यवादीही आघाड्यांवर राहिले. अशी परिस्थिती निर्माण केली गेली की, आजचा समाज हा प्रत्येक पातळीवर कोणाच्यातरी अधिपत्याखाली राहु लागला वावरु लागला. शोषक व्यवस्थेनं विषमव्यवस्थेच्या समर्थनार्थ आपली साधनं व शस्त्र नेहमी बदलत ठेवली. " १

जागतिकीरणाच्या रेट्याने जसे जनजीवन ढवळून निघाले तसाच त्याचा परिणाम कृषीसंस्कृतीवरही झाला देशाच्या अर्थव्यवस्थेत

कृषी संस्कृतीचा वाटा सर्वात अधिक म्हणजे ७० टक्के इतका असुन शेतकऱ्याची बियाण्याच्या काळजीने त्याच्या नवोन्मेशु मेंदूची उगवणशक्तीच नष्ट झाली आहे. खताच्या काळजीने त्याच्या काळजात काटा रुतला आहे. अशी आणि यासारखी इतरही बांधवांनी कृषी प्रधान देशातला शेतकरी हवालिदल झाला असून तो मरणाला कवटाळतो आहे. या भूमीतून जीवासाठी संजवनी निर्माण करणारा शेतकरी जळी-स्थळी, काष्ठी पाषाणी हतबल होऊन जगतो आहे यासर्व विदारक स्थितीचे पडसाद कवी हेमंत कुमार कांबळे यांच्या 'आयुष्य नांगरतांना' या किवतेतून उमटतात. "भारत आणि इंडिया ही विभाजन रेषा शेतकरी आंदोलनाने १९८० ते १९९० च्या दशकात प्रभावी पणे मांडली गेली. तिचे पडसाद नव्वद नंतरच्या अनेक कवितांतूनही उमटले आहेत."[2] त्याची विविधांगी मांडणी कवी हेमंत कांबळे सहजपणे करतात.

*"हा देश तरी कृषिप्रधान कसा म्हणावा*
*जिथे शेतकरीच मरतात*
*कुत्र्याच्या मौतीने*
*ना कुणा सोयर ना कुणा सुतक*
*या सोन्याचा धुर उगाळणाऱ्या*
*देशाच्या भट्टीतले*
*जळते लाकूड म्हणजे कास्तकार "*[3]

(आयुष्य नांगरतात पृ.क्रं. ४८)

शेतकऱ्याचे कष्ट, त्याचे दुःख त्याचे सातत्याने होणारे शोषण याला करणीभूत असणारी अर्थ व्यवस्था व तिला नियंत्रित करणारी शासनप्रणाली यामुळे शेतकऱ्यांची जीवनाची हेळसांड झाली आहे. मराठी पारंपारिक कवितेत कालवादी व जीवनवादी प्रवाह आधुनिक मराठी साहित्यच्या आरंभीच उदयास आला. परंपरावादी व सुधारणावादीच्या विचाराने मराठी कविता विकसीत होत होती. त्या पार्श्वभूमीवर जागतिकरणाच्या प्रक्रियेत "दलित कविता ही जीवन व काव्याला एक नवे परिमान देणारी कविता ठरली. दलित कवितेचे अंतरंग हे प्रामुख्याने सामाजिक जाणिवेचे आहे. ही समाजिक जाणिव अधिक प्रगल्भ व गतिमान करण्यात आंबेडकरी जाणिवेची भूमिका क्रांतीकारी ठरली." [4] दिलत कवितेने समाजातील व्यवहारिक पातळीवरुन प्रत्यक्ष लढा दिला. त्याचप्रमाणे तत्वज्ञानाच्या पातळीवरुनही वैचारिक संघर्ष दिला.

भारतीय तत्वज्ञानात दोन प्रवाह आहेत एक वर्णव्यवस्थेचा वैदिक ब्राम्हणी प्रवाह आणि श्रमण बौध्द तत्वज्ञानाचा दुसरा प्रवाह होय. या दोन तत्वज्ञानातून दोन संस्कृतीची जडण-घडण झाली. एक ब्राम्हणी संस्कृती, व दुसरी बौध्द संस्कृती दोन भारतीय समाज घडले. या दोन समाजसंस्कृती मिळूनच भारतीय समाजजीवन घडले. मुसलमान राजवटीनंतर भारतीय समाजात बौध्द विचार क्षीण झाला. तो समतेचा न्यायाचा विचार डॉ. बाबासाहेबांच्या प्रयत्नाने पुन्हा जीवंत झाला. हाच स्वातंत्र्याचा समतेचा व न्याचा विचार दलित कवींनी जागतिकिकरणाच्या काळात नव्याने मांडला. त्यांनी वैदिक तत्वज्ञान पूर्णतः नाकारुन बौध्द तत्वज्ञ ाान स्वीकारले, वर्णवादी समाज नाकारुन वर्ण विरिहत व पोषकसमाजनिर्मितीची मूल्ये काव्यातून अविष्कृत केली. ब्राम्हणी संस्कृतीला झिडकारुन बौद्ध संस्कृतीची प्राचीन विरासत देऊन तीचा अंगीकार करण्यास प्रोत्साहित केले. काळ बदलला 'वापरा आणि फेका' हे व्यावहारिक तत्व मोठ्या प्रमाणात स्विकारल्या गेलं. हे जीवन वास्तव दिवसागणिक उघड्या डोळ्यांनी दलित कवींनी अनुभवल म्हणतात 'ना जे न पाहे रवि ते पाहे कवी' या पार्श्वभूमीवर दलित कवितेचे वाङ्मयदृष्ट्या महत्वाचे स्थान आहे. जातीसंस्था, अस्पृश्यता, गावगाडा कुटूंबसंस्था शिक्षण, दारिद्र्य, दैण्य, घरं गावं. रुढीचा पगडा धर्मजीवन रुढी प्रामान्य शोषण, गुलामगीरी, ज्ञान, श्रम, अशा प्रकारचे प्रखर वास्तव दलित कवितेत प्रगट झाले आहे." [5] जे अनुभवलं ते कवितेत लिहिलं अशी प्रामाणिक कबुली दलित कवींनी दिली आहे.

जगात माहिती आणि तंत्रज्ञानाचा स्फोट होत असतांना आजही अज्ञानाच्या अंधःकारात चाचपडणारा विराट मानवसमाज आपल्या पुढे आहे. समाजिक विषमता, दारिद्र्य, आणि निरक्षरता ही मागील शतकांची देणी या शतकालाही चकुली नाहीत "इंटरनेट मुळे जशी जगाला जोडणारी गतीमान व्यवस्था अस्तित्वात आली तशी माणसाला माणसापासून तोडणारी अमानुष जातीव्यवस्था ही चिरंजीवी होत आहे" [६] एकवीसावं शतक हे माहिती तंत्रज्ञानाच्या पावलाने आपल्या जीवनात आलं त्यामुळे जागतिकीकरण मुक्त अर्थव्यवस्था आणि खाजगीकरणाच्या अनुकल विचारातून विकासाचा विचार मांडला जात आहे. जागतिकीकरणासोबत आलेली नाणेनिधी, जागतिक बँक, व परदेशी प्रसारण वाहिण्या यामुळे आपली पारंपारिक रचना बदलही.

१) जागतिकीकरणाची संगणक आणि इंग्रजी ही दोन पावलं आहेत. इंटरनेट, उपग्रह यासारख्या आधुनिक तंत्रज्ञामुळे ज्ञान आणि माहितीच्या जगात फार मोठी क्रांती झाली आहे ही काळीच पाऊले ओळखून दलित कविता मार्गक्रमण करते आहे.

२) सूर्य स्वतःभोवती प्रंचड वेगाने परिभ्रमण करत असतांना त्याची शकले झाली. पृथ्वी आणि चंद्र ही ती शकले होत, अत्यंत तप्त अवस्थेत ही शकले सूर्याभोवती परिभ्रमण करु लागली. तप्त पृथ्वीचा गोळा कालांतराने थंड होऊन त्यावर जीवसृष्टी निर्माण झाली. या पृथ्वीतलावर माकडापासून माणूस तयार झाला ह्यावर जगातल्या कोणत्याही धर्मग्रंथाने विश्वास ठेवला नाही. मात्र दलित कविता याला अपवाद आहे.३)आज उपलब्ध असलेल्या दलित कवींच्या काव्यसंग्रहातून दलितांना क्रांतीसाठी आणि सामाजिक परिवर्तनासाठी त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पासून प्रेरणा व स्फुर्ती घेऊन वाटचाल सुरु केली.

४) दलित कवितेने 'अत्त दीप भव' हा मूलमंत्र जागतिकरणाच्या काळात अधिक व्यापक केला. परमेश्वराला शरण न जाता 'तूम्हीच तुमचा प्रकाश व्हा' हे डॉ. आंबेडकरांचे विचार दलित कवितेने शिरोधार्थ मानले.

## संदर्भ ग्रंथ


१) अवचार सुनील अभिमान, 'पीएम ऑफ दी ऑक्युपाय एन्हरिथिंग' नभ प्रकाशन, अमरावती, प्रथमत आवृत्ती, २०१२, पृ.क्रं.६

२) जाधव, डॉ गजानन, 'आयुष्य नांगरतांना', संपादन, कान्डजे डॉ. एस. एस. पैलू, त्रैमासिक रुद्रायणी प्रकाशन औरंगाबाद पृ.क्र. ९

३) तत्रैव पृ.क्रं. १०

४) खरात डॉ. प्रकाश, 'साहित्य समीक्षा बदललेले मापदंड', विजय प्रकाशन, नागपुर प्रथम आवृत्ती २०१०, पृ.क्रं. ५४

५) तत्रैव, पृ.क्रं. २६

६) लिंबाळे शरणकुमार , 'शतकातील दलित विचार', दिलिपराज प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती २००१ पृ.कं. १०